**नारायण सोनवणे विरूध्द संजय शेलार**
**निशाणी क्र. ०७ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक होणेसाठी वादींनी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतचा दावा हा वादींनी निरंतरची ताकिद मिळणेकामी व दाव्यातील नमुद मिळकतीच्या हद्दी व खुणा ठरवुन मिळणेकामी दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार दावा कलम १ मधील नमुद वादीचे मिळकतीचे उत्तरेस प्रतिवादीची जमिन आहे. वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीचे दरम्यान पुर्व-पश्चिम असा सामाईक बांध असुन प्रतिवादी वादीचे जमिनीत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीच्या चारही बाजुचे बांध व बांधाच्या हद्दी खुणा कायम करुन मिळणेसाठी, अतिक्रमीत क्षेत्र दुर करुन मिळणेसाठी, वादी व प्रतिवादी दरम्यान असलेला पुर्व पश्चिम बांध निश्चीत करुन मिळणेसाठी, अतिक्रमण निघाल्यास ते दुर करुन मिळणेसाठी सदरचा दावा केला आहे. प्रतिवादी हे दावा कलम १ मध्ये वर्णन मिळकतीची मोजणीकामी परवानगी देत नाहीत. त्यामुळे वादीने तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक होवुन दावा कलम १ मध्ये नमुद केलेला गट नं. २५१२ चे चारही बांध व बांधाच्या खुणा तसेच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेला पुर्व पश्चिम तसेच दक्षिणोत्तर बांधाच्या खुणा व हद्दी कायम करुन मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींना वारंवार संधी देवुनही त्यांनी सदर अर्जास मागील पाच वर्षाचा कालावधी उलटुनही त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींचे म्हणणेविना चालविण्यात आला आहे.

४. वादींचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. पटलावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दाव्यातील व कैफीयतमधील कथनांचे अवलोकन केले.

५. वादींचे कथनानुसार वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीचे दरम्यान पुर्व पश्चिम असा बांध असुनही प्रतिवादी वादीचे जमिनीत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे न्यायालयीन आयुक्त नेमुन वादीचे गट नं. २५१२ चे चारही बांध व बांधाच्या खुणा तसेच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेला पुर्व पश्चिम तसेच दक्षिणोत्तर बांधाच्या खुणा व हद्दी कायम करुन दिल्यास सदरचे दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होण्यास मदत होणार आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादीने सदर अर्जात नमुद केलेल्या मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. वादीने सदरचा अर्ज दिनांक २७/०८/२०१५ रोजी दाखल केला आहे. परंतु, वारंवार संधी देवुनही प्रतिवादीने सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज विनाआव्हानीत राहिला आहे. वरील बाबीचा विचार करता वादी व प्रतिवादीमधील खरा वाद सोडविण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नेमणे योग्य व न्यायोचीत आहे. सबब, खालील आदेश परित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यांत येतो.

२. तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

३. तुकडी जिल्हा नशिक पैकी पोटतुकडी तालुका निफाड पैकी मौजे आझेर मिग शिवारातील शेतमिळकत गट नं. २५१२/२ या मिळकतीचे चारही बांध व बांधाच्या खुणा तसेच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेला पुर्व-पश्चिम तसेच दक्षिणोत्तर बांधाच्या खुणा व हद्दीकायम करुन नकाशासह अहवाल सादर करावा. मोजणीपुर्वी न्यायालयीन आयुक्त यांनी वादी व प्रतिवादी यांना मोजणीबाबत नोटीस पाठवावी.

४. वादी यांनी सदर कोर्ट कमिश्नर यांची फी तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, निफाड यांचे कार्यालयात परस्पर जमा करावी.

( श्री. पी. के. कापडे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
पिंपळगांव (ब)

दिनांक :- २६/११/२०२१.